दिनांक :   .०३.२०२०

प्रति,

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी,

भारत सरकार, नवी देहली

**विषय : धर्मनिरपेक्ष भारतात धर्मावर आधारित चालणारी 'हलाल प्रमाणपत्र' व्यवस्था तात्काळ बंद करण्याविषयी आणि असे प्रमाणपत्र देणाऱ्या सर्व संस्थांची चौकशी करण्याविषयी....**

महोदय,

सध्या भारतीय मुसलमानांकडून प्रत्येक पदार्थ, वस्तू इस्लामनुसार वैध अर्थात 'हलाल' असण्याची मागणी केली जाऊ लागली आहे. ही मागणी केवळ मांसापुरती मर्यादित राहिली नसून धान्य, फळे, सौंदर्यप्रसाधने, औषधे आदी उत्पादनेही हलाल नामांकित असावीत, अशी मागणी मुसलमान करत आहेत. त्यासाठी व्यापाऱ्यांना आवश्यकता नसतांनाही प्रत्येक उत्पादनासाठी २१ सहस्र ५०० रुपये भरून 'हलाल' प्रमाणपत्र घ्यावे लागत आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हे प्रमाणपत्र अन्न आणि औषध प्रशासनाकडून नव्हे, तर 'जमियत-उलेमा-ए-हिंद' या मुसलमान संघटनेकडून दिले जाते. या हलाल अर्थव्यवस्थेने विश्वभरात दबदबा निर्माण केला असून तिने भारताच्या अर्थव्यवस्थेइतका म्हणजे २ ट्रिलीयन डॉलर्सचा टप्पाही गाठला आहे. हिंदूंचा व्यापार आणि व्यवसाय यांमध्ये हस्तक्षेप करून समांतर आर्थिक व्यवस्था उभी करण्याचे हे जागतिक षड्यंत्र आहे. या अर्थव्यवस्थेमुळे अल्पसंख्य मुसलमानांची बहुसंख्यांकांवर एक प्रकारची हुकूमशाहीच चालू आहे. तरी या संदर्भात आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की...

*** तरी या प्रकरणी आम्ही आपल्या लक्षात आणून देत आहोत की**

१. भारत सरकारने शरीयत आधारित 'इस्लामिक बँक' भारतात चालू करण्याची मागणी फेटाळून लावली. यामुळे थेट धर्माच्या आधारावर निधी गोळा करण्याची नवी शक्कल मुसलमानांनी लढवली होती. कोणताही ग्राहक संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याचा लाभ घेऊन त्याच्या धर्मानुसार संमत साहित्य आणि पदार्थ यांचा आग्रह धरू शकतो. याचा आधार घेत मुसलमानांकडून प्रत्येक पदार्थ, वस्तू इस्लामनुसार वैध अर्थात 'हलाल' असण्याची मागणी केली जाऊ लागली आहे.

२. देशात केवळ १५ टक्के असणाऱ्या अल्पसंख्य मुसलमान समाजाला इस्लामनुसार संमत 'हलाल मांस' खायचे आहे, म्हणून उर्वरित ८५ टक्के जनतेवरही ते लादण्यात येऊ लागले. आता तर हे 'हलाल प्रमाणपत्र' केवळ मांसापुरते मर्यादित न राहता, खाद्यपदार्थ, सौंदर्यप्रसाधने, औषधे, रुग्णालये, गृहसंस्था, मॉल यांसाठीही चालू झाले. सुप्रसिद्ध 'हल्दीराम' या कंपनीचे शुद्ध शाकाहारी 'नमकीन'सुद्धा आता 'हलाल प्रमाणित' झाले आहे. त्यात सुकामेवा, मिठाई, धान्य, तेल यांपासून ते साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, नेलपॉलिश, लिपस्टिक आदी सौंदर्यप्रसाधनांचा समावेश आहे. यामुळे हलाल प्रमाणपत्राच्या आधारे मांसासह या अन्य पदार्थांचा व्यवसायही हिंदु उद्योजकांकडून बळकावला जात आहे.

३. ही मागणी आता केवळ खासगी आस्थापनांपुरती मर्यादित न रहाता यात निधर्मी भारत सरकारची रेल्वे सेवा आणि 'एअर इंडिया' यांतही 'हलाल' अनिवार्य करण्यात आले आहे. 'भारत देश हा धर्मनिरपेक्ष आहे', असे सांगितले जाते. असे असतांना केवळ 'इस्लाम'ला मान्य असलेली उत्पादने रेल्वे आणि एअर इंडिया यांमध्ये कशी काय विकली जाऊ शकतात ? अशा प्रकारे एखाद्या हिंदू उद्योजकाने एखादे उत्पादन

चालू करून त्यांनीच प्रमाणित केलेल्या वस्तू घ्याव्यात, असा निर्णय बंधनकारक केल्यास शासनाच्या रेल्वे आणि एअर इंडिया यांच्यासारख्या सरकारी आस्थापनांना ते मान्य होईल का ?

४. भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत 'अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण' तसेच प्रत्येक राज्यात स्वतंत्र अशी 'अन्न आणि औषध प्रशासन' या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. एकीकडे खाद्यपदार्थांशी संबंधित प्रमाणपत्र देणारी 'सेक्युलर' शासनाची व्यवस्था असतांना 'हलाल प्रमाणपत्र' देण्याची अनुमती खासगी इस्लामिक धार्मिक संस्थांना का देण्यात आली आहे ? याचसमवेत सरकार जेव्हा अशा पदार्थांना प्रमाणपत्र देते, तेव्हा त्याची चाचणी घेतली जाते. 'हलाल'चे प्रमाणपत्र देतांना मात्र शासनाचे कोणतेही बंधन न पाळता खासगी संस्था केवळ धार्मिक आधारावर देत असलेल्या हलाल प्रमाणपत्राच्या नावे केली जाणारी शुल्क आकारणी वैध का ठरवली जाते ? या खाद्यपदार्थांमधून कोणाला गंभीर आरोग्य समस्या उद्भवल्यास त्याचे दायित्व कोण घेणार ?

६. हलाल उत्पादनांतून लाभ मिळवायचा आणि तो नफा इस्लामिक बँकेद्वारे उत्पादनांच्या वृद्धीसाठी वापरायचा, तसेच इस्लामिक बँकेतून हलाल उत्पादने बनवणाऱ्यांना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून द्यायचे आणि जागतिक स्तरावरील बाजारावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करायचा. असे केल्यामुळे संपूर्ण साखळीवर त्यांचे नियंत्रण राहिल्याने इस्लामिक बँकेच्या स्थितीत लक्षणीय पालट झाला. बँकेच्या संपत्तीत वर्ष २००० मध्ये असलेल्या ६.९ टक्क्यांवरून वर्ष २०११ मध्ये २२ टक्के इतकी वृद्धी झाली. 'हलाल इंडस्ट्री' जगभरात सर्वाधिक वेगाने वाढणारी व्यवस्था बनली आहे. अर्थात इस्लामच्या आधारे 'हलाल इंडस्ट्री' आणि 'हलाल अर्थव्यवस्थे'च्या आधारे 'इस्लामिक बँक' मोठी बनत चालली आहे.

७. भारतात हलाल प्रमाणपत्र देणाऱ्या अनेक खाजगी संस्था आहेत. त्यात प्रामुख्याने हलाल इंडिया प्रा. लिमिटेड, हलाल सर्टिफिकेशन सर्व्हिसेस इंडिया प्रा. लिमिटेड, जमियत उलेमा-ए-हिंद हलाल ट्रस्ट, जमियत उलेमा-ए-महाराष्ट्र यांचा समावेश आहे.

८. मुसलमान व्यक्तीने मिळवलेले मांसच हलाल मानले जात असल्याने मांसाचा ६३ सहस्र ६४६ कोटी रुपयांचा व्यापार मुसलमानांकडे गेला आहे. त्यामुळे हिंदु खाटीक समाज आणि हिंदु व्यापारी बेरोजगार बनत चालले आहेत.

### * 'जमियत उलेमा-ए-हिंद' संघटनेविषयी

भारतात हलाल प्रमाणपत्र देणारी 'जमियत उलेमा-ए-हिंद' ही एक मुख्य संघटना आहे. भारतात ब्रिटिशांच्या राजसत्तेला विरोध करण्यासाठी वर्ष १९१९ मध्ये या संघटनेची स्थापना करण्यात आली. काँग्रेससह ही संघटना कार्यरत होती आणि तिने फाळणीला विरोध केला होता. फाळणीच्या वेळी या संघटनेचे २ तुकडे होऊन त्यातील 'जमियत उलेमा-ए-इस्लाम' या संघटनेने पाकिस्तानचे समर्थन केले होते. आज ही शक्तीशाली मुसलमान संघटना म्हणून ओळखली जाते.

नुकतेच या संघटनेचे बंगालचे अध्यक्ष सिद्दीकुल्ला चौधरी यांनी नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या विरोधात 'केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना विमानतळाच्या बाहेर पडू देणार नाही', अशी धमकीही दिली होती. याच संघटनेने उत्तरप्रदेशमधील हिंदु नेते कमलेश तिवारी यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींचे खटले लढण्याचे घोषित केले होते. या संघटनेने ७/११ चा मुंबई रेल्वे बॉम्बस्फोट, वर्ष २००६ चा मालेगाव बॉम्बस्फोट, पुण्यातील जर्मन बेकरी बॉम्बस्फोट, २६/११ चे मुंबईवरील आक्रमण, मुंबईतील झवेरी बाजारातील साखळी बॉम्बस्फोट, देहलीतील जामा मशीद स्फोट, कर्णावती (अहमदाबाद) शहरातील स्फोट अशा अनेक आतंकवादी घटनांतील आरोपी मुसलमानांसाठी कायदेशीर साहाय्य उपलब्ध करून दिले आहे. अशा एकूण ७०० जणांचे खटले जमियत लढवत आहे. यासाठीचा लागणारा निधी हलाल

प्रमाणपत्रांद्वारे हिंदूच त्यांना एक प्रकारे मिळवून देत आहेत. याचा अर्थ हलाल निधीचा वापर आतंकवादाच्या आरोपींना साहाय्य करण्यासाठी येत आहे, हे स्पष्ट आहे.

**※ तरी या संदर्भात आम्ही पुढील मागण्या करत आहोत....**

१. कोणतेही उत्पादन बाजारात विक्री करण्यासाठी भारत सरकारने जी नियमावली सिद्ध केली आहे, ती सोडून केवळ धर्माच्या आधारावर कोणालाही स्वतंत्र प्रमाणपत्र देऊन ती वस्तू बाजारात विकण्याची अनुमती देण्यात येऊ नये.

२. ज्या ज्या खासगी आस्थापनांना ‘हलाल’ प्रमाणपत्र देण्याची अनुमती देण्यात आली आहे, त्या सर्व आस्थापनांची अशी अनुमती त्वरित रहित करण्यात यावी. शासनाच्या रेल्वे, एअर इंडिया यांच्यासारख्या ज्या ज्या सरकारी आस्थापनांमध्ये असे प्रमाणपत्र दिलेल्या वस्तू विकल्या जातात, त्याची अनुमती त्वरित रहित करण्यात यावी.

३. आजपर्यंत ज्या इस्लामिक संस्थांनी ‘हलाल’पत्र दिले, त्या सर्व संस्थांची सीबीआयद्वारे चौकशी करून या निधीचा वापर आतंकवाद्यांना साहाय्य करण्यासाठी झाला का ? यामागे कोणते आंतरराष्ट्रीय षड्यंत्र नाही ना ?, याची सखोल चौकशी करण्यात यावी. त्यात काही तथ्य आढळल्यास संबंधित संस्था आणि त्यांचे पदाधिकारी यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

आपला विश्वासू,

संपर्क :